# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/01/2024 (मंगळवार) दुपार

## पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कार्यवाही

पोस्टे खापरखेडा अंतर्गत ०१ किमी अंतरावर खापरखेडा येथे दिनांक १५/०१/२०२४ चे १८/०० वा. ते १९/०० वा. दरम्यान फिर्यादी आपले स्टाफसह पोस्टे परिसरात प्रोवीशन जुगार रेड करीत असताना गुप्त बातमीद्वारे मिळालेल्या माहितीवरून यातील **आरोपी नामे– १) आर्यन संदीप फुलझरे, वय १८वर्ष २) संतोष हिरालाल गुप्ता, वय ५० वर्ष दोन्ही रा. वार्ड क्रमांक ०३ खापरखेडा** हे आपल्या घरी ५ चक्री नायलॉन मांजा प्रत्येकी अंदाजे किंमती ५००/–रू. प्रमाणे असा एकूण २५००/–रू. नायलॉन मांजा लपवून विक्री करीत असल्याचे दिसून आल्याने सदरच्या दोन्ही आरोपी विरुद्ध पोस्टे खापरखेडा येथे अप. क्रमांक २४/२०२४ कलम १८८, ३४ भादंवी सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील पाटणसावंगी येथे नितीन जनरल स्टोअर्स येथे लपून छपुन नायलॉन मांजा व गुंजी विक्री करीत आहे. अशी गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या माहितीवरून आरोपी नामे– नितीन उर्फ अतुल विठ्ठल शंभे, रा. वार्ड नं ५ पाटणसावंगी याचे दुकानाची झडती घेतली असता दुकानात प्रतिबंधित ३ नायलॉन मांज्याच्या चक्री व १२ नग गुंजी असा एकूण ४१००/– रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपी नितीन विठ्ठल शंभे, वय ४५ वर्ष, रा. पाटणसावंगी याचे विरुध्द ५, १५ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सह कलम १८८ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





## जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदाः— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा मौदा धांडे ऑटो सर्व्हिसेस चे मालक यांचे घर येथे दिनांक १४/०१/२०२४ चे २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान यातील जखमी नामे— सम्भु कुमार महेंद्र सिंग वय २८ वर्ष, रा. बेचुडीया, पुरहरा, जि. औरंगाबाद बिहार व **आरोपी नामे— समसाद अमानत अंसारी, वय २२ वर्ष, रा. टाटी, पोस्ट कुडु, लोहदगा झारखंड** हे त्यांचे मित्रासह एकाच रूम मध्ये राहत होते. जखमी कडून आरोपीने पैसे उधार घेतले होते. त्यावरून त्यांच्यात पैशाच्या वादावरून झगडा भांडण होत होते. फिर्यादी नामे— मुन्नाकुमार वल्द श्री. रामप्रितराम कुमार वय २३ वर्ष, रा. ग्राम पोस्ट तंडवा, आचल नबी नगर ब्लॉक जि. औरंगाबाद राज्य बिहार, ह. मु. धांडे ऑटो सर्व्हिसेसचे मालक यांच्या घरी किरायाने मौदा, जखमी व आरोपी हे त्यांच्या मित्रासह घरी हजर असताना त्यांच्या बाजुच्या रूम मधील आरोपीचा मित्र आरोपीला भेटायला आला असता जखमी याने म्हटले की, ''आज इधर आना नही, तुम कल आकर बात करना'' त्यावर तो वापस गेला. नंतर आरोपी याने फिर्यादीला म्हटले की, ''तुने मेरे दोस्त को ऐसा क्यो बोला'' असे म्हणून हाताने चेहऱ्यावर बुक्की मारली असता फिर्यादीच्या डाव्या डोळया जवळ जखम झाली. तेव्हा जखमीने आरोपीला हटकले व फिर्यादी याला समजावत असताना आरोपी याने मागेहून येऊन किचनच्या ओटयावर असलेला भाजी कापण्याचा चाकू घेऊन जखमीच्या गळयावर वार करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला आहे.

यावरून सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३२३ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. पुंडलिक भटकर तसेच पोलीस निरीक्षक सार्थक नेहते, चार्ज पोस्टे मौदा यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी, मो. नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर